BEAM पोर्टलच्या तांत्रिक अडचणींनी धान उत्पादकांची फरफट नको; नोंदणी व E-KYC प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांचे ना. छगन भुजबळ यांना पत्र

आ. मुनगंटीवार यांची २०२४-२५ मधील लांबच लांब रांगांची पुनरावृत्ती टाळण्याची मागणी; शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आवाहन

ऑनलाइन पर्यायी सुविधा, पोर्टलमधील तांत्रिक दोषांचे निराकरण आणि स्वतंत्र मदत कक्ष सुरू करण्यावर भर

चंद्रपूर - शेतात घाम गाळून धानाचे पीक उभे करणाऱ्या शेतकऱ्याला आपल्या हक्काच्या उत्पादनाची विक्री करण्यासाठी सरकारी यंत्रणेच्या दारात वारंवार चकरा माराव्या लागणे, तासन्‌तास रांगेत उभे राहावे लागणे आणि केवळ तांत्रिक अडचणींमुळे मनस्ताप सहन करावा लागणे, ही बाब अत्यंत वेदनादायी आहे. आधीच वाढता उत्पादन खर्च, मजुरी आणि नैसर्गिक संकटांशी झुंजणाऱ्या धान उत्पादकांच्या अडचणींत BEAM पोर्टलमधील तांत्रिक दोष व किचकट E-KYC प्रक्रियेची भर पडू नये, यासाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी संवेदनशील भूमिका घेतली आहे. आधारभूत किंमत धान खरेदी हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांची नोंदणी सुलभ व्हावी, त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचावेत तसेच मागील हंगामातील लांबच लांब रांगांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी आ. मुनगंटीवार यांनी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगनजी भुजबळ यांना पत्र लिहून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

आधारभूत किंमत धान खरेदी हंगाम २०२६-२७ साठी शेतकऱ्यांची नोंदणी करताना BEAM पोर्टलवर विविध तांत्रिक अडचणी येत असल्याने शेतकरी, खरेदी केंद्र चालक आणि संगणक चालकांना समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे आमदार मुनगंटीवार यांनी पत्रात निदर्शनास आणून दिले आहे. मागील खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये नोंदणी प्रक्रियेदरम्यान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यंदा पुन्हा सर्व शेतकऱ्यांची E-KYC करणे आवश्यक असल्यास त्यासाठी प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहण्याची वेळ येऊ शकते. परिणामी, गर्दी वाढून शेतकऱ्यांना विनाकारण आर्थिक भुर्दंड आणि शारीरिक त्रास सहन करावा लागू शकतो, अशी चिंता आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर BEAM पोर्टलमधील सर्व तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून नोंदणी प्रक्रिया सुरळीत करावी, E-KYC साठी ऑनलाइन अथवा अन्य पर्यायी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि पूर्वी नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची उपलब्ध माहिती वापरून अनावश्यक पुनर्नोंदणी टाळण्याचे व्यवहार्य पर्याय तपासावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच तांत्रिक समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी स्वतंत्र मदत कक्ष सुरू करावा आणि खरेदी केंद्र चालक व संगणक चालकांना स्पष्ट मार्गदर्शक सूचना द्याव्यात, असेही आ. मुनगंटीवार यांनी पत्रात नमूद केले आहे.

नोंदणीअभावी पात्र शेतकरी धान विक्रीपासून वंचित राहू नयेत!

धान खरेदी प्रक्रियेतील तांत्रिक अडचणींचा फटका कोणत्याही पात्र शेतकऱ्याला बसू नये, ही या मागणीमागील

आ. मुनगंटीवार यांची प्रमुख भूमिका आहे. नोंदणी प्रक्रियेतील विलंबामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये आणि त्यांना धान विक्रीसाठी अनावश्यक अडथळ्यांचा सामना करावा लागू नये, यासाठी संबंधित विभाग व तांत्रिक यंत्रणेला स्पष्ट निर्देश देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंती आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे केली आहे.

शेतकऱ्यांना सुलभ आणि त्रासमुक्त व्यवस्था मिळणे आवश्यक!

मागील हंगामातील अनुभव लक्षात घेऊन यंदा नोंदणी प्रक्रियेत कोणताही गोंधळ निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने आधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांच्या सोयीसाठी व्हावा; त्यांच्यासाठी तो नव्या अडचणींचा स्रोत बनू नये. शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचविणारी सुलभ, पारदर्शक आणि त्रासमुक्त व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी या पत्राद्वारे केली आहे.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 9650 /ऑक्टोंबर/2026 दिनांक : 21/10/2026

प्रति,

मा. श्री. छगनजी भुजबळ,
मंत्री, अन्न व नागरी पुरवठा विभाग,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

सप्रेम नमस्कार,

**विषय:** आधारभूत किंमत धान खरेदी हंगाम 2026-27 साठी BEAM पोर्टलमधील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून शेतकरी नोंदणी व E-KYC प्रक्रिया सुलभ करण्याबाबत.

**महोदय,**

आधारभूत किंमत धान खरेदी हंगाम 2026-27 साठी शेतकऱ्यांची नोंदणी करताना BEAM पोर्टलवर येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी, खरेदी केंद्र चालक आणि संगणक चालक यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास येत आहे.

मागील खरीप हंगाम 2024-25 मध्ये धान खरेदी नोंदणी प्रक्रियेदरम्यान शेतकऱ्यांना खरेदी केंद्रांवर लांबच लांब रांगा लावाव्या लागल्या होत्या. आता पुन्हा सर्व शेतकऱ्यांची E-KYC करणे आवश्यक असल्यास, प्रत्येक शेतकऱ्याला प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे मागील हंगामाप्रमाणेच गर्दी निर्माण होऊन शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जाण्याची भीती आहे.

धान उत्पादक शेतकऱ्यांना आधीच उत्पादन खर्च, मजुरी आणि नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत पोर्टलमधील तांत्रिक अडचणी आणि किचकट नोंदणी प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांना वारंवार खरेदी केंद्रावर चकरा माराव्या लागणे योग्य ठरणार नाही. त्याचबरोबर पोर्टलच्या संथ गतीमुळे खरेदी केंद्र चालक व संगणक चालकांवरही अतिरिक्त कामाचा ताण निर्माण होतो.

1. BEAM पोर्टलमधील सर्व तांत्रिक अडचणी तातडीने दूर करून नोंदणी प्रक्रिया सुरळीत करावी.

2. E-KYC प्रक्रियेसाठी ऑनलाइन अथवा अन्य पर्यायी सुविधा उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना प्रत्येक वेळी प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहण्याची आवश्यकता कमी करावी.

3. पूर्वी नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची उपलब्ध माहिती वापरून अनावश्यक पुनर्नोंदणी टाळण्याबाबत व्यवहार्य पर्याय तपासावा.



Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र विधानसभा

सुधीर मुनगंटीवार
विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक :

दिनांक :

4. पोर्टलमधील तांत्रिक समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी स्वतंत्र मदत कक्ष सुरू करावा आणि खरेदी केंद्र चालक व संगणक चालकांना स्पष्ट मार्गदर्शक सूचना द्याव्यात.

5.2024-25 प्रमाणे शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागू नयेत, तसेच नोंदणीअभावी कोणत्याही पात्र शेतकऱ्याला धान विक्री करताना अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.

तातडीची मागणी :

धान खरेदी हंगाम सुरू असताना शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये आणि नोंदणी प्रक्रियेत विलंब होऊन त्यांना त्रास सहन करावा लागू नये, यासाठी या प्रकरणी तातडीने हस्तक्षेप करून संबंधित विभाग व तांत्रिक यंत्रणेला त्वरित कार्यवाहीचे स्पष्ट निर्देश द्यावेत. तसेच, केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन नोंदणी प्रक्रिया सुरळीत सुरू होईल, याची खात्री करावी.

मागील अनुभवातून धडा घेऊन यंदा पुन्हा 2024-25 सारखी परिस्थिती निर्माण होऊ नये. शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचविणारी सुलभ व त्रासमुक्त व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

तरी, या गंभीर विषयाची तातडीने दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, ही विनंती.

**धन्यवाद.**

आपला

**(सुधीर मुनगंटीवार)**

प्रति,

1. मा जिल्हा मार्केटिंग अधिकारी चंद्रपूर.
2. श्री बंडू गौरकार सदस्य महाराष्ट्र राज्य कृषीमुल्य आयोग मुंबई
3. श्री चंदु मारगोनवार तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी मुल
4. श्री हरीश ढवस तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी पोभुर्णा
5. श्री श्रीनिवास जगंमवार तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी चंद्रपूर
6. श्री चंद्रकांत देऊळकर तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी बल्लारपुर
7. श्री रवि चहारे जिल्हाअध्यक्ष भाजपा किसान मौर्चा चंद्रपूर महानगर



Scanned with OKEN Scanner